24 AUG 2024
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## विद्यापीठातील अभ्यासिका विस्तारीकरणासाठी दिली २५ लाख रुपयांची देणगी

# स्त्रीधन विकले, आईने दिलेले वचन पाळले

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** ज्या विद्यापीठात मुलगी शिकली, ज्या विद्यापीठामुळे कुटुंबाला सावरले, त्या विद्यापीठाच्या ऋणातून उतराई होण्यासाठी अन् मुलीच्या स्मृती चिरंतन राहण्यासाठी शिवाजी विद्यापीठातील सेवानिवृत्त भूगोल अधिविभागप्रमुख व ज्येष्ठ कायदा अभ्यासक डॉ. ॲड. राम पणदूरकर व त्यांच्या पत्नी हेमकिरण यांनी कन्या डॉ. ॲड. रुपाली यांच्या स्मरणार्थ कमवा व शिका महिला वसतिगृहातील अभ्यासिकेसाठी ३५ लाख रुपयांची देणगी गतवर्षी दिली होती. त्या देणगीमधून अभ्यासिकेचा तळ मजला पूर्ण झाला आहे. त्याचा धनादेश देताना हेमकिरण पणदूरकर यांनी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांना आणखी देणगी देण्याचे वचन दिले होते. ते वचन पूर्ण करण्यासाठी हेमकिरण यांनी त्यांचे दागिने, आभूषणे विकून अभ्यासिकेच्या पहिल्या मजल्यासाठी २५ लाख रुपयांचा धनादेश कुलगुरू डॉ. शिर्के यांच्याकडे सुपूर्द केला.याप्रसंगी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. संभाजी शिंदे उपस्थित होते.



सेवानिवृत्त भूगोल अधिविभागप्रमुख डॉ. ॲड. राम पणदूरकर व पत्नी हेमकिरण यांनी त्यांची कन्या डॉ. ॲड. रुपाली पणदूरकर यांच्या स्मरणार्थ अभ्यासिकेसाठी २५ लाख रुपयांची देणगी कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे सुपूर्द केली.

> मी विद्यापीठांत कार्यरत होतो. माझ्या मुलीनेही विद्यापीठातच शिक्षण घेतले असून, विद्यापीठामुळे आमचे कुटुंब घडले, सावरले. त्यामुळे त्या ऋणातून उतराई होण्यासाठी आणि मुलीच्या स्मृती चिरंतन राहण्यासाठी अभ्यासिकेसाठी देणगी दिली.
>
> \- डॉ. ॲड. राम पणदूरकर.

24 AUG 2024
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात राष्ट्रीय अंतराळ दिन उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान विभागामध्ये शुक्रवारी राष्ट्रीय अंतराळ दिन साजरा करण्यात आला.

भारत मंडपम येथे इस्रोकडून प्रसारित झालेल्या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण सभागृहामध्ये करण्यात आले. यावेळी कोल्हापूरचे शास्त्रज्ञ अमेय भागवत यांनी इस्रोद्वारा निर्मित विविध उपग्रहामधील स्पेसक्राफ्ट पॉवर सिस्टिम, सौरघट, सौरघट ॲरे, विविध ग्राउंड टेस्ट याविषयी माहिती दिली. विभाग प्रमुख प्रा. राजेंद्र सोनकवडे अध्यक्षस्थानी होते. विकसित केल्या जाणाऱ्या अवकाश तंत्रज्ञाचा मानवास खूप लाभ होत असून त्याची प्रगती वेगाने होत आहे, असे सोनकवडे यांनी सांगितले. डॉ. राजीव व्हटकर यांनी प्रास्ताविक केले. यावेळी प्रा. के. वाय. राजपुरे, डॉ. ए. व्ही. मोहोळकर, डॉ. एन. एल. तरवाळ, डॉ. एम. व्ही. टाकळे, डॉ. व्ही. एस. कुंभार, डॉ. एस. एस. पाटील, डॉ. एम. आर. वाईकर आणि डॉ. ए. आर. पाटील, साधना परीट, साक्षी काळे उपस्थित होते. डॉ. एस. पी. दास यांनी आभार मानले.

24 AUG 2024

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांच्या 'स्टार्टअप'साठी विद्यापीठ कटिबद्ध

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : 'स्टार्टअप'च्या यादीत अमेरिका, चीननंतर भारत तिसऱ्या स्थानी आहे. प्रथम स्थानप्राप्तीसाठी केंद्र व राज्य सरकार प्रयत्नशील आहे. 'स्टार्टअप' योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कल्पनांना आकार देत नवउद्योगांच्या स्थापनेसाठी शिवाजी विद्यापीठ कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य (आयआयएल) केंद्राचे संचालक डॉ. सागर डेळेकर यांनी केले.

हिंदी विभाग व कोल्हापूर रिसर्च अँड डेव्हलपमेंट फाउंडेशन (एसयूके आरडीएफ)च्या वतीने गुरुवारी आयोजित विशेष कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी हिंदी विभागाच्या प्र. प्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी, तंत्रज्ञान विभागाचे संचालक डॉ. एस. एन. सपली, एसयूके आरडीएफचे संचालक डॉ. पी. डी. राऊत उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

24 AUG 2024
लोकमत

# खासगी विद्यापीठांमधील महागड्या अभ्यासक्रमांकडे विद्यार्थ्यांचा ओढा

## डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांचे मत

लोकसत्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** उच्च शिक्षणातील खासगीकरणाचे प्रमाण निश्चितच चिंता वाढविणारे आहे. अनुदानित अभ्यासक्रमापेक्षा लाखोंचे शुल्क भरून विद्यार्थी खासगी विद्यापीठे, विना अनुदानित महाविद्यालयांना का प्राधान्य देत आहेत, याचा गंभीरपणे विचार करण्याची वेळ आली आहे.

परंपरागत संस्था व अभ्यासक्रमात बदल केले नाहीत तर त्यांचा निभाव लागणे अवघड आहे, अशी चिंता उच्च शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी येथे व्यक्त केली. राज्यातील सुमारे दोन हजार महाविद्यालयांनी 'नॅक' मानांकन मिळवले असल्याची माहितीही त्यांनी दिली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ६६ वा वर्धापनदिन शुक्रवारी (दि.२३) विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला. याप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. विजय फुलारी होते. यावेळी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती. तर प्रख्यात लोककलावंत पांडुरंग घोटकर, प्र-कुलगुरू डॉ. वाल्मिक सरवदे, कुलसचिव डॉ. प्रशांत अमृतकर, लोककलावंत कृष्णा मुसळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी डॉ. देवळाणकर म्हणाले, आजघडीला एक हजार ९२८ महाविद्यालयांनी 'नॅक' मानांकन मिळवले असून दर्जाच्या बाबतीत महाराष्ट्र देशात अव्वल ठरला आहे.

24 AUG 2024
लोकसत्ता
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राज्यातील महाविद्यालयांमध्ये 'आपले सरकार सेवा कक्ष'

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** राज्यातील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना दाखले सुलभतेने मिळण्यासाठी आता 'आपले सरकार सेवा कक्ष' महाविद्यालयांमध्ये स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार जी महाविद्यालये सेवा केंद्रासाठी मागणी करतील, त्यांना मान्यता दिली जाणार आहे.

सामान्य प्रशासन विभागाने या बाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला. अहमदनगर जिल्ह्यातील १० तालुक्यांतील १५ महाविद्यालयांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर आपले सरकार सेवा केंद्र सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे. शासनाचा हा निर्णय लोकप्रिय झाला आहे. या निर्णयाच्या धर्तीवर महाविद्यालयांत आपले सरकार सेवा केंद्र सुरू करण्याबाबत राज्यातील इतर ठिकाणांवरून मागणी असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे महाविद्यालयात आपले सरकार सेवा केंद्र स्थापन करण्याचा निर्णय राज्यभरात लागू करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

या निर्णयानुसार राज्यातील ज्या महाविद्यालयांकडून आपले सरकार सेवा केंद्र सुरू करण्याची मागणी करण्यात येईल, त्यांना सेवा केंद्र सुरू करण्यास मान्यता देण्यात येईल. महाविद्यालयातील आपले सरकार सेवा केंद्राला मंजुरी देताना संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांच्या सल्लाने कार्यवाही करावी. तसेच त्याबाबत महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाशी तांत्रिक सहाय्यासाठी समन्वय साधावा, असे नमूद करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 AUG 2024
सकाळ

# महादेव मोरे यांना विद्यापीठात अभिवादन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील मराठी अधिविभागात आज ज्येष्ठ लेखक महादेव मोरे यांना अभिवादन करण्यात आले. निपाणी गावच्या, सीमाभागातील साहित्यिकाची या विभागाने 'लेखक संवाद' उपक्रमात डॉ. रमेश साळुंखे यांनी घेतलेली मुलाखत आणि पीठाक्षरं हा माहितीपट पदव्युत्तर विद्यार्थ्यांना दाखवला. मराठी विभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी लेखक मोरे यांच्या वाङ्मयीन जीवनाची जडणघडण यावर भाष्य केले. डॉ. रणधीर शिंदे यांनी लेखक मोरे यांनी लेखनातील दुर्लक्षित वंचित घटकांच्या जीवन जाणिवांचा वेध घेतला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 AUG 2024

तरुण भारत

# 'विद्यार्थ्यांच्या 'स्टार्टअप'साठी शिवाजी विद्यापीठ कटिबद्ध'

कोल्हापूर : 'स्टार्टअप'च्या यादीत अमेरिका, चीननंतर भारत तिसऱ्या स्थानी आहे. प्रथमस्थान प्राप्तीसाठी सरकार प्रयत्नशील आहे. त्यांनी सुरू केलेल्या 'स्टार्टअप'तून नवउद्योगांसाठी विद्यापीठ कटीबद्ध आहे, असे प्रतिपादन नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्राचे संचालक डॉ. सागर डेळेकर यांनी केले. कोल्हापूर रिसर्च अँड डेव्हलपमेंट फौंडेशनच्या वतीने आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. प्रास्ताविकात डॉ. पी. डी. राऊत यांनी योजनांविषयी माहिती दिली. डॉ. प्रकाश मुंज यांनी आभार मानले. यावेळी शिवानंद पाटणे, डॉ. तृप्ती करेकट्टी, डॉ. एस. एन. सपली, डॉ. संतोष कोळेकर, डॉ. अक्षय भोसले, डॉ. गीता दोडमणी, प्रा. प्रकाश निकम, डॉ. जयसिंग कांबळे, डॉ. सुषमा चौगुले, प्रा. अनिल मकर, श्रृतिका सरगर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 AUG 2024
तरुण भारत

# कॉटेंप्रोररी नृत्य कार्यशाळा विद्यापीठात उत्साहात

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागात कॉटेंपोररी नृत्य कार्यशाळा उत्साहात पार पडली. कार्यशाळेसाठी शोवन दास (बांग्लादेश) यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यशाळा नृत्य व नाटकासाठीही उपयुक्त ठरली. शेवटच्या दिवशी सहभागी विद्यार्थ्यांच्या नृत्याने कार्यशाळा झाली. कार्यशाळेमध्ये अनेक विद्यार्थी उपस्थित होते. सरस्वती पूजनाने कार्यशाळेला सुरवात झाली. विद्यापीठातील संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. विनोद ठाकुर-देसाई यांनी प्रास्ताविक केले. ज्येष्ठ रंगकर्मी डॉ. संजय तोडकर यांनी स्वागत केले. यावेळी डॉ. सचिन कचोटे, प्रशांत देसाई आदी उपस्थित होते.